




दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध    Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा    Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २०४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०७ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाची घोषणा !

## मुंबई महानगर प्रदेशासाठी घोषणांचा पाऊस; रेल्वे, मेट्रो, रस्त्यांसह विविध विकासकामांची घोषणा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज राज्याचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात महाराष्ट्राची राजधानी मुंबईसाठी भरघोस घोषणा करण्यात आल्या. २०४७ पर्यंत राज्याची नागरी लोकसंख्या ७० टक्के होणार असून स्थूल राज्य उत्पन्नात या घटकाचे ७५ ते ८० टक्के योगदान असणार आहे. राज्यात शाश्वत शहरी विकास करण्याकरता १० पेक्षा जास्त सक्षम प्राधिकरण स्थापन करणं, ५० पेक्षा अधिक सुनियोजित बहुउपयोगी शहरी समूह विकसित करणं, वाहतूक केंद्रीय विकास तसेच शहरी स्थानिक स्वराज्य सेवा संस्थांच्या सेवा १०० टक्के डिजीटलाइज करण्याचं नियोजित आहे, असं देवेंद्र फडणवीस सुरुवातीला म्हणाले. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १४० अब्ज डॉलरवरुन ३०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दीष्ट्य ठेवलं आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यानंतर मुंबईसाठी काय-काय नवीन विकासकामे केली जातील आणि किती निधी देण्यात येईल, याबाबत मुख्यमंत्री सविस्तर माहिती दिली.

**मुंबईसाठी करण्यात आलेल्या घोषणांची संपूर्ण माहिती**



वडाळा येथे जागतिक दर्जाचे स्टार्टअप आणि इनोव्हेशन हबसाठी १३० एकर जमीन वाटप करण्यात आली आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गातील ठाणे ते तलासरीमधील ३ स्थानकांचे काम २०२७ अखेर पूर्ण होणार आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाद्वारे निर्माण होणाऱ्या आर्थिक मुल्याचा फायदा घेण्यासाठी विरार, भोईसर आणि ठाणे बुलेट ट्रेन स्थानकाभोवतीच्या क्षेत्राच्या विकासाकरता आराखडा तयार करण्यात येईल. अटल बिहार वाजपेयी शिवडी-नावाशेवा अटल सेतू परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्यात येईल. या अंतर्गत करनाळा-चिरनेर, रायगड, पेण आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्र ही ग्रीनफिल्ड विकास केंद्र म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे.

पालघर जिल्ह्याच्या वाढवण जवळ चौथी मुंबई विकसित करण्याचे नियोजित असून त्या अंतर्गत लॉजिस्टीक आणि विअर हाऊसिंगसाठी विकास केंद्र निर्माण करण्यात येतील.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मुंबई महापानगर प्रदेशातील २० लाख झोपडपट्टीधारकांच्या पुनर्विकासासाठी तसेच भाडेतत्वावरील घरांसह १० लाख परवडणारी घरे विकसित करण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेशात नवीन बेकायदेशीर बांधकाम होणार नाहीत याची खात्री करण्यासाठी जीआयएस आधारित मॅपिंगचा वापर करुन नो न्यू स्लम फ्रेमवर्क विकसित करण्यात येणार आहे. सदर फ्रेम वर्क पुढे इतर शहरांतदेखील लागू करण्यात येईल. केंद्र शासनाकडून नीती आयोगामार्फत देशभरातील निवडक शहरांचा, निवडक क्षेत्रांचा आर्थिक वाढीचा रोडमॅप तयार करण्यात येत आहे.

**जलवाहतूक :** १२५ कि.मी.चे जलमार्ग जाळे ३४० कि.मी.चे करणार, २१ जलमार्गावरील २० टर्मिनल्सचे अद्ययावतीकरण, ११ नवीन जलमार्गावर २४ नवीन टर्मिनल्स, यासाठी ६६०० कोटी, मुंबईतील रेडिओ क्लब येथील नवीन जेट्टी डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करणार

वडाळा, मुंबई येथे जागतिक दर्जाचे स्टार्टअप आणि इनोव्हेशन हब

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनची ठाणे ते तलासरी मार्गावरील तीन स्थानके फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण होणार. विरार, बोईसर, ठाणे स्थानकाभोवती विकासाचा बृहद आराखडा तयार करणार

अटलसेतूला जोडून २०० चौरस कि.मी. क्षेत्रात तिसरी मुंबई घडवणार : कर्नाळा, साई, चिरनेर नवनगर आणि नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्र ही ग्रीनफिल्ड शहरे तयार करणार

**वाढवण बंदर :** चौथी मुंबई. लॉजिस्टीक्स आणि वेअर हाऊसिंगसाठी

विकास केंद्र निर्माण करणार, वाढवण बंदरामुळे १२ लाखांहून अधिक रोजगार, मासेमारांसाठी सातपाटी येथे अत्याधुनिक मत्स्यबंदर, आसपासच्या ४४ गावांत कौशल्य विकासाचे उपक्रम राबविणार

**मरीन शिपयार्ड क्लस्टर विकसित करणार...**

मुंबई महानगर प्रदेशात २० लाख झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करणार, १० लाख परवडणारी घरांची निर्मिती करणार, नवीन झोपडपट्टी होणार नाही, यासाठी 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क' प्रणाली

वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रो ११ २३,४८७ कोटींचा संपूर्ण भूमिगत प्रकल्प, याचा पुढे धारावी, वांद्रे स्थानक, वांद्रे टर्मिनस असा विकास

मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो ८ : २२,८६२ कोटी तळोजा ते खांदेश्वर नवी मुंबई मेट्रो २ : ५५७५ कोटी

**मुंबईतील भुयारी मार्ग :** ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीनड्राईव्ह, गोरेगाव-मुलुंड, ठाणे ते बोरीवली, खारघर ते तुर्भे, वांद्रे-वरळी सागरी सेतू ते हायस्पीड रेल्वेस्थानक वांद्रे-कुर्ला संकुल ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई

मुंबई महानगरात गायमुख जंक्शन ते फाऊंटेन हॉटेल जंक्शन ते पुढे भाईंदर असा अनुक्रमे ६ आणि ९ कि.मी.चा भुयारी मार्ग

**उन्नत मार्ग :** शिवडी-वरळी, ऐरोली कटाई नका, ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटलसेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, छेडानगर ते आनंदनगर व आनंदनगर ते साकेत, ठाणे

**सागरी सेतू :** मुंबई ते वाढवण बंदर जोडण्यासाठी उत्तन ते विरार सागरी सेतू: ५८,७५४ कोटी, स्वातंत्र्यवीर सावरकर वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू तसेच वर्सोवा-दहीसर-भाईंदर ही कामे वेगाने सुरु

**किनारी मार्ग :** बाळकुम ते गायमुख, उलवे किनारी मार्ग

**कल्याण ते लातूर ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग तयार करणार**

पनवेल-कर्जत उपनगरीय प्रकल्प ३ बी १४,९०७ कोटी, यातून बदलापूर-कर्जत, आसनगाव ते कसारा, पनवेल ते वसई, ६९ कि.मी.चा नवीन उपनगरीय कॉरिडॉर

मुंबई आणि पुण्यात ५० अब्ज डॉलर्सचे मिडिया टेक आणि एव्हीजीसी केंद्र बनविणार, ३० लाखांहून अधिक रोजगार निर्मितीसाठी नवीन ४०० जीसीसी (जागतिक क्षमता केंद्र) तसेच नवउपक्रम शहरांची उभारणी करणार

---

## लोकाभिमुख निर्णयांनी समृद्ध असा, राज्याचा अर्थसंकल्प : आ.किशोर जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** राज्य सरकारच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला यंदाचा अर्थसंकल्प हा २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडवण्याच्या दृष्टीने दूरदृष्टी ठेवून मांडलेला असल्याची प्रतिक्रिया आ. किशोर जोरगेवार यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा हा अर्थसंकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त समिती स्थापन करणे, संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करणे तसेच बाबासाहेब आंबेडकर शताब्दी वर्षानिमित्त रायगड येथे पायाभूत सुविधा उभारण्याची घोषणा ही सामाजिक व सांस्कृतिक वारशाचा सन्मान करणारी आहे. तसेच अजितदादा पवार यांच्या कार्याला श्रद्धांजली म्हणून स्मारक व नागरी पुरस्कार सुरू करण्याची घोषणा ही त्यांच्या योगदानाचा गौरव करणारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या अर्थसंकल्पातील विविध योजना



आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमुळे चंद्रपूर जिल्ह्यालाही मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण रस्त्यांचा विकास, शेतकऱ्यांसाठीच्या योजना, नैसर्गिक शेती अभियान, उद्योगांना चालना देणारे धोरण तसेच विदर्भातील औद्योगिक व पर्यटन विकासाच्या योजनांमुळे चंद्रपूर जिल्ह्यात रोजगारनिर्मिती आणि विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास आ. किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा तिसरा टप्पा, हजारो किलोमीटर रस्ते व पूल, मुंबई-पुणे जलदगती ट्रेन, मेट्रो व द्रुतगती मार्ग यांसारख्या प्रकल्पांमुळे राज्याच्या पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार आहे. शेती क्षेत्रात ॲग्रीस्टॅक, फार्मर आयडी, एआयचा वापर, नैसर्गिक शेती अभियान तसेच शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय स्वागतार्ह असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन गुंतवणूक धोरण, सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योग केंद्र, सौरऊर्जा प्रकल्प, बांबू विकास आणि गडचिरोली स्टील हब यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू ठेवण्यासाठी भरीव तरतूद केल्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाला बळ मिळेल. एकूणच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा सकारात्मक व लोकाभिमुख अर्थसंकल्प असल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

---

## अर्थसंकल्पात शैक्षणिक प्रगतीला ब्रेक : आ. सुधाकर अडबाले

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह विधान परिषदेत अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सादर केलेल्या सन २०२६-२७ च्या महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पात अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या असल्या तरी शिक्षण क्षेत्राकडे मात्र पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले आहे. विशेषतः मराठी माध्यमाच्या शाळांचा विकास, शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अडचणी तसेच विद्यार्थ्यांना नवीन शिक्षण प्रणालीशी सुसंगत सुविधा देण्याबाबत या अर्थसंकल्पात कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली दिसत नाही.



राज्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत बाबींवर लक्ष न देता केवळ निवडणुका, राजकारण आणि मत मिळवण्याच्या दृष्टीने काही घोषणांचा पाऊस पाडण्यात आला आहे. ठेकेदारी पद्धतीला चालना देत कंत्राटदारांना फायदा होईल अशा योजनांना प्राधान्य देण्यात आले असून शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाबाबत सरकारची भूमिका निराशाजनक आहे.

शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा पाया आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांचे बळकटीकरण, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचे तातडीने निराकरण आणि विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, या अर्थसंकल्पात त्या दृष्टीने कोणतीही ठोस तरतूद नसल्याने हा अर्थसंकल्प शिक्षण आणि शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने पूर्णपणे अपुरा आणि दिशाहीन ठरतो.

---

## थेटाळे गावच्या उपसरपंचपदी सोनाली शिंदे यांची बिनविरोध निवड

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, थेटाळे (नाशिक) :** येथील ग्राम पंचायतीच्या उपसरपंचपदी सोनाली सुनील शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. माजी उपसरपंच श्रीमती अंजनाबाई फकिरा शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर चक्राकार पद्धतीने ही निवड प्रक्रिया पार पडली.

**निवड प्रक्रिया आणि उपस्थिती :** नूतन उपसरपंच निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी किशोर दत्तात्रय मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पडली. सोनाली शिंदे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. याप्रसंगी सरपंच शीतल शिंदे, माजी उपसरपंच श्रीमती शिंदे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य कुशारे, पवन माळी, अनिता निरभवने, श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे आणि रंजना माळी उपस्थित होते.




**नूतन उपसरपंचांचे स्वागत :** निवडीनंतर लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णा ज्ञानेश्वर जगताप, बबन शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, अजित शिंदे, सुनील शिंदे आणि समाधान माळी यांनी नूतन उपसरपंचांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम करणार आहे, असा विश्वास नूतन उपसरपंच सोनाली शिंदे यांनी निवडीनंतर व्यक्त केला.

---

## मंद्रूप मध्ये तरुणाने तर तेरामैल येथे एका तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०६, सोलापूर :** मंद्रूप येथे एका २५ वर्षीय तरुणाने तर बसवनगर (तेरामैल) येथे एका १९ वर्षीय तरुणीने शुक्रवारी गळफास घेऊन आत्महत्या केली. या दोन्ही गावातील तरुण मुलाने व मुलीने अज्ञात कारणावरून आपले जीवन संपविल्याने दोन्ही गावात हळहळ व्यक्त होत आहे.

पहिल्या घटनेत अभिजीत सिद्रामप्पा मेंडगुदले (वय २५) राहणार मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. मंद्रुप पोलीस ठाण्यात या दोन्ही घटनेची अकस्मात मयत म्हणून नोंद झाली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, मयत अभिजीत मेंडगुदले या तरुणाचे मंद्रुप येथे लोकसेवा शाळेसमोर अभिजीत या नावाने टीव्हीएस मोटरसायकल विक्रीचे दुकान होते. काल रात्री तो सकळेश्वर गल्लीतील आपल्या घरी आई-वडिलांसोबत जेवण केले. नंतर घराच्या गच्चीवरील खोलीत झोपण्यास गेला. सोबत त्याचा सुमीत हा भाऊ होता. आज शुक्रवारी पहाटे





पाच वाजता भावाने पाहिले असता अभिजीत हा झोपलेले ठिकाणी नव्हता. बाजूला असलेल्या दुसऱ्या खोलीचा दरवाजा बंद होता. त्याने आई-वडिलांना याची माहिती दिली. दरवाजा उघडून पाहिले असता छताला नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन अभिजीत हा लटकत असलेला दिसला. गळफास काढून त्याला मंद्रुप येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. मात्र डॉक्टरांनी तपासून उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

दुसऱ्या घटनेत पल्लवी किसन पवार (वय १९) राहणार बसवनगर(तेरामैल) (ता. दक्षिण सोलापूर) या तरुणीने शुक्रवारी सकाळी पावणे नऊच्या सुमारास राहत्या घरी अँगलला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. पल्लवीचे बारावीपर्यंतचे शिक्षण झाले होते. तिचे वडील किसन लालसिंग पवार हे रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आज सकाळी पावणे नऊच्या सुमारास वडील किसन पवार हे रिक्षा स्टॉप वर थांबले होते. तेव्हा मुलगा संदेश याने पल्लवी हिने दरवाजा बंद करून घेतल्याचे सांगितले. तेव्हा पळत जाऊन घरच्या पाठीमागील खोलीच्या खिडकीतून पाहिले असता घरातील अँगलला साडीने तिने गळफास घेतल्याचे दिसले. गावातील नागरिकांच्या मदतीने दरवाजा तोडून तिला मंद्रुपच्या ग्रामीण रुग्णालयात आणले. मात्र तिचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. मयत पल्लवी हिच्या पश्चात वडील किसन, आई सविता, बहिण संजना, भाऊ संदेश व कुणाल असा परिवार आहे.

या दोन्ही दुर्दैवी घटनेची नोंद मंद्रुप पोलीस ठाण्यात झाली आहे. या दोन्ही घटनेचा अधिक तपास एएसआय बापू शिंदे व हवालदार मसलखांब हे पोलीस करीत आहेत.

# नाठाळांचे माथी हाणावी काठी!



माझा वाद माझ्या विठ्ठलाशी नव्हे, तर त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या बडव्यांशी आहे,' असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे काही वर्षांपूर्वी म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्यावरून तेव्हा वादाचे मोहोळ उठले होते. पंढरपुरातील बडव्यांनीही आपली बदनामी झाल्याचे सांगून हरकत नोंदवली होती. ठाकरेंच्या विधानाला राजकीय संदर्भ असले, तरी अलीकडे देवालयांची पायरी चढणाऱ्या भाविकांतही अशीच भावना बळावताना दिसते. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वरमध्ये काही तासांपूर्वी भाविकाला झालेली मारहाण हे त्याचे ठळक उदाहरण. धार्मिक स्थळांवर वाद वा गडबड-गोंधळ नवा नाही. परंतु, ज्यांच्या भरवशावर अशा धार्मिक स्थळांचे महात्म्य वाढते, तेथील अर्थकारणाला गती मिळते, त्या भाविकांचेच कपडे फाडून त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्याची हिंमत वारंवार दाखवली जात असेल, तर काय म्हणावे ? अशा मंडळींचे धारिष्ट्य का वाढते आहे, याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. वास्तविक, मंदिरातील देवाची छबी डोळ्यांत साठवण्यासाठी रांगेत खस्ता खात तासन्तास थांबण्याचा संयम दाखवणाऱ्यांचेही पूजन व्हायला हवे. घडते मात्र उलटच.

अवघ्या काही महिन्यांनी सिंहस्थ कुंभमेळ्याला सामोरे जाणाऱ्या त्र्यंबकेश्वराची दर्शनबारी अलीकडे सातत्याने हाणामाऱ्या आणि गैरसोयींनी चर्चेत आहे. भाविकांना दर्शनासाठी चार-पाच तास रांगेमध्ये ताटकळावे लागते. सुविधा नसल्याने रांगेतील घुसमटीला कंटाळलेला भाविक गर्भगृहापर्यंत येईस्तोवर घायकुतीला आलेला असतो. तो उंबऱ्यावर डोके टेकवतो, तोच सुरक्षारक्षकांनी त्याला बाजूला केलेले असते. या रेटारेटीत एखाद्याचा संयम सुटला की वाद उद्भवतो. महाराष्ट्र सुरक्षा दल (एमएसएफ) आणि मंदिराचे सुरक्षारक्षक मग अक्षरशः तुटून पडतात. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी काही गोष्टी करणे वेगळे; पण कोणी भावनेच्या भरात चूक केली, तर त्याला रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण करायची, हा कोणता कायदा? नव्या वर्षात परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी मारहाणीची मालिका सुरू राहणे चिंताजनक आहे. अर्थात, ही सुधारणा कोण आणि का करणार, हाही प्रश्नच आहे. दोनशे रुपयांचे पेड दर्शन घेणाऱ्यांची अवस्था तर 'हात दाखवून अवलक्षण' अशी झालेली असते. खिशातून शे-पन्नासची नोट बाहेर काढलेल्यांना उंबऱ्यावर डोके टेकवू दिले जाते. नोट त्याहीपेक्षा मोठी असेल, तर खडीसाखरेचा प्रसाद आणि नारळही मिळतो.

दर्शन घडवून आणणाऱ्या या टोळ्या नेटाने सक्रिय असतात. गंध लावणाऱ्यापासून ते अगदी विश्वस्त पुजाऱ्यांपर्यंत त्यांचे धागेदोरे असल्याचे आरोप होतात. या साखळीतील प्रत्येक घटकाची रोजची कमाई गर्दीनुसार एक हजार ते लाखभर रुपयांपर्यंत सहज असते. 'मटा'सह अनेक माध्यमांनी भाविकांना लुटणाऱ्या या टोळ्यांचा वेळोवेळी भंडाफोड केलेला आहेच. बातम्या प्रसिद्ध झाल्या की त्रुटी दूर केल्याचा दावा केला जातो आणि काही दिवसांनी 'येरे माझ्या मागल्या' स्थिती असते. दर्शन व्यवस्थेत अकस्मात बदल केले जातात, ज्यात लांबून येणारेच भरडले जातात. दर्शनबारीत सुसूत्रता आल्यास आपली 'दुकाने' बंद होतील या भीतीपोटी ही मंडळी सुधारणांनाही विरोध करतात. अस्वच्छता, पिण्याचे पाणी नसणे, पार्किंगचा अभाव हे प्रश्न साक्षात देव अवतरले तरी सुटणे अशक्य, अशी बाकी स्थिती.

तिरुपती-शिर्डीनंतरच्या यादीत श्रीमंतीचा नंबर लागणाऱ्या अनेक देवालयांत दुर्दैवाने हेच चित्र कमी-अधिक फरकाने दिसते. धार्मिक स्थळांचे अर्थकारण जोरात असले, तरी सुविधांच्या नावाने बोंब असते. श्रद्धेच्या बाजारातही मधली साखळीच भारी पडते. 'देखल्या देवाला दंडवत' या भाविकांच्या वृत्तीने त्यांचे फावत असते. स्थानिक पुढाऱ्यांच्या सहभागाशिवाय भाविकांशी हातघाई करण्याची हिंमत यंत्रणा दाखवूच शकणार नाही. अशा 'नाठाळांच्या माथी हाणावी काठी' असा उपदेश संतश्रेष्ठ तुकोबा महाराज करतात. परंतु, प्रश्न एवढाच आहे की, जे साक्षात देवाच्या काठीचीही पर्वा करीत नाहीत, ते या काठीला तरी डरतील काय ?

**-- संपत थेटे**

# विश्व विजयापासून एक पाऊल दूर

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या उपान्त्य फेरीत भारताने इंग्लंडला ७ धावांनी हरवून अंतिम फेरीत धडक मारली आणि सलग दुसऱ्यांदा टी २० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचण्याची करामत केली. अर्थात भारताला हा विजय सहज मिळाला नाही हा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगला.

अतिशय रोमहर्षक ठरलेल्या या सामन्यात इंग्लंडने भारताला जशास तसे उत्तर देऊन १४५ कोटी जनतेच्या हृदयाचे ठोके वाढवले. बुधवारी न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला सहज हरवत अंतिम फेरी गाठली अंतिम सामन्यात त्यांच्या सोबत कोण खेळणार याचे उत्तर गुरुवारच्या सामन्यातून मिळणार होते त्यामुळे सर्वांची नजर टीव्ही कडे लागली होती. इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुक्स याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतली. प्रथम गोलंदाजी घेऊन भारताला लवकरात लवकर बाद करण्याचा त्याचा मनसुबा होता त्याचा हा मनसुबा काही प्रमाणात यशस्वी होताना दिसला. भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा पुन्हा एकदा स्वस्तात बाद झाला पण दुसरा सलामीवीर आणि महत्वाच्या क्षणी फॉर्मात आलेल्या यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसनने त्याच्या मनसुब्यावर पाणी फेरले. त्याने या सामन्यातही तडाखेबंद फलंदाजी करत ८९ धावा तडकावल्या.

त्याला ईशान किशन, शिवम दुबे याने चांगली साथ दिली. हार्दिक पांड्या, तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनीही छोट्या पण महत्वाच्या खेळी केल्याने भारताने २० षटकात २५३ धावा काढल्या. टी २० विश्वचषकात सलग दोनदा अडीचशे धावांचा टप्पा ओलांडणारा भारत हा जगातला पहिला संघ ठरला. उपान्त्य फेरीसारख्या निर्णायक सामन्यात अडीचशे धावांचा पाठलाग करणे सोपे नसते त्यामुळे भारत हा सामना सहज जिंकेल असा कयास बांधला जात होता. सर्वांनाच तसे वाटत होते मात्र इंग्लंडच्या फलंदाजांच्या मनात वेगळेच होते. त्यांचा सलामीचा फलंदाज फील सॉल्ट आणि कर्णधार हॅरी ब्रुक्स स्वस्तात बाद झाले पण युवा जेकब बेथेल ने हार मानली नाही. एकीकडे समोरचे फलंदाज बाद होत असताना त्याने एकबाजू लावून धरली ती ही तडाखेबंद फलंदाजी करत. फलंदाज जरी बाद होत असले तरी त्यांनी जवळपास बाराच्या सरासरीने धावा काढणे सुरूच ठेवले त्यामुळेच सतराव्या षटकापर्यंत सामना इंग्लंडच्या आवाक्यात होता. मात्र १८ व्या षटकात बुमराने अवघ्या सहा धावा देऊन सामना भारताच्या बाजूने झुकवला. पुढच्याच षटकात हार्दिक पांड्याने त्याची पुनरावृत्ती केली आणि विजयावर शिक्कामोर्तब केले. या दरम्यान जेकब बेथेल याने आपले शतक पूर्ण केले पण त्याचे शतक व्यर्थ्य गेले आणि भारत अंतिम फेरीत पोहचला. भारताच्या या विजयाचे शिल्पकार संजू सॅमसन आणि जसप्रीत बुमरा ठरले.

संजू सॅमसनला सामन्याचा मानकरी पुरस्कार मिळाला पण त्याने मोठ्या मनाने जसप्रीत बुमरा हा या पुरस्काराचा खरा मानकरी असल्याचे कबूल केले. या विजयासोबतच भारताने विश्व विजयाकडे आणखी एक दमदार पाऊल टाकले. भारत आता विश्व विजयापासून अवघे एक पाऊल दूर आहे. जर भारतीय खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला आणि नशिबाने साथ दिली तर भारत हे एक पाऊल पार करून सलग दुसऱ्यांदा आणि आणि एकुणात तिसऱ्यांदा आणि ते ही घरच्या मैदानावर टी २० विश्वचषकावर नाव कोरून इतिहास रचू शकतो. अंतिम फेरीसाठी भारतीय संघाला खूप खूप शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# घराला घरपण देणारी....महिला

महिलांनी स्वतःच्या हक्कांसाठी जो लढा दिला त्याच्या स्मरणार्थ ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. तर संपूर्ण अमेरिका, आणि युरोप सहित जवळपास जगभरातल्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवाती पर्यंत मतदानाचा हक्क नाकारला होता. त्याविरोधात महिलांनी लढा उभारला होता,त्याच वेळी जर्मनीतल्या कम्युनिस्ट कार्यकर्ती क्लारा झेटकिन प्रभावित झाली.असा एखादा दिवस असावा, ज्या दिवशी जगभरातल्या महिला आपल्या मागण्यासाठी लढ्याचा निर्धार व्यक्त करू शकतील.अशी कल्पना मांडली.१९१० मध्ये कोपनहेगनला झालेल्या परिषदेत ८मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून ठराव पास झाला.

पण भारतात मुंबई येथे ८मार्च १९४३ रोजी पहिला महिला दिन साजरा झाला. दरवर्षी येणाऱ्या सणा प्रमाणे जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहानं साजरा केला जात असतो.वर्षभरात ज्या महिलांनी, शिक्षण,कला,क्रिडा,साहित्य,राजकीय क्षेत्रात विशेष कार्य केल असतं,तसेच काही महिलांनी एखादे विशेष प्रावीण्य दाखविले असते,अशा महिलांचा सत्कार,केला जातो.सन्मान केला जातो.अनेक संस्था, कार्यालयात, महिला दिन साजरा केला जातो.अशा रितीने महिलांचा सन्मान करणे उचितच आहे.तो करायलाच हवा. महिला दिन का साजरा केला जातो ?ह्याची सुरूवात कधी झाली ? ह्या बाबतीत मात्र बहुसंख्य महिला अनभिज्ञ आहेत.आठ मार्च महिला दिन आहे, तो साजरा करणे फक्त एवढेच केले जाते.

महिला दिन असा निरनिराळ्या ठिकाणी साजरा होत असतानाच मनात अनेक प्रश्न उपस्थित होतात.ते अगदी सहज आहे.

अनेक महिलांनी निरनिराळ्या क्षेत्रात जसे शिक्षण, साहित्य, कला,राजकीय, सामाजिक, क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सत्तेची पद भुषविली आहेत.त्यांना संधी दिली तर त्या काय करु शकतात हे दाखवून दिले आहे.आपले वेगळेपण सिध्द केले आहे.

स्व.ईंदिरा गांधी, स्व.सुषमा स्वराज्,श्रीमती प्रतिभाताई पाटील, सुमित्राताई महाजन, द्रौपदी मुर्म, आदी महिलांनी आपले वेगळेपण सिध्द केल आहे.उच्च पदावर त्या पोहचल्यात.

तर मेधा पाटकर,यांनी समाजिक कार्यात स्वःतला झोकून दिले आहे. किरण बेदींची प्रशासकीय कारकीर्द पोलिस प्रशासनात,तिहार जेलमध्ये केलेल्या बदलाने उल्लेखनीय ठरली होती.मीरा बोरवणकर,सुधा मूर्ती आहेत. आजही राजकीय क्षेत्र बघितले तर,डाँ निलम गोरे,खा.सुप्रिया सुळे,आ. पंकजा मुंढे,खा.प्रणिती शिंदे,,आ.भावना गवळी,खा.रक्षा खडसे,आ. श्‍ध्दा महाले, खा.डॉ. मेधा कुळकर्णी,या महिलांनी राजकीय क्षेत्रात आपलं स्थान निर्माण केलय.अनेक लेखिका आहेत,शिक्षण क्षेत्रातील महिला आहेत, कला.क्षेत्र, त्यांनी वेगळं स्थान निर्माण केलयं.आजही अनेक महिला प्रशासकीय सेवेत उच्च पदावर कार्य करीत आहेत.मुख्य सचिव, आयुक्त,जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक,,तहसीलदार, गट विकास अधिकारी, नगर पालिका मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी,बँक अधिकारी अनेक क्षेत्र आहेत.कुठलं क्षेत्र बाकी नाही.आय.टी. क्षेत्रात तर खूप मुली दाखल होत आहे.

जुना इतिहास बघितला तर जिजाबाई, , राणी लक्ष्मीबाई, आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले,अशी अनेक उदाहरणे देता येतील.महिलांनी एक वेगळा क्रांतीकारी ईतिहास घडवलाय.आनंदीबाई, सावित्रीबाईंनी




स्त्रीशिक्षणाचा,स्त्रीमुक्तिचा पाया रचला.पुण्यात महिलांसाठी पहिली शाळा काढली.एकूण अठरा शाळा काढल्यात. पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले, पहिली महिला आयपीएस महाराष्ट्र मीरा बोरवणकर, पहिली महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, पहिली महिला मंत्री शालिनीताई पाटील, पहिली महिला न्यायाधीश उच्च न्यायालय सुजाता मनोहर, त्यानंतर मृदुला भाटकर, पहिली महिला महापौर निर्मिती सावंत प्रभावळकर, पहिली महिला राज्यपाल विजयालक्ष्मी पंडित, पहिली महिला एव्हरेस्ट सर करणारी कृष्णा पाटील, पहिली महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ल, पहिली महिला साहित्य संमेलन अध्यक्ष कुसुमावती देशपांडे,नंतर दुर्गा भागवत, अरुणा ढेरे,राष्ट्रपतीपदी प्रतिभाताई पाटील.अशी प्रतिभावान महिलांची उदाहरणे आहेत.

आई सारखे दैवत साऱ्या जगा मध्ये नाही किंवा जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगासी उध्दारी असे आपण नेहमीच म्हणतो. पण- आता दुसऱ्या बाजूचा विचार बघीतला तर सध्या त्या जगाचा उध्दार करणाऱ्या, दैवत असणाऱ्या, ज्या स्त्री शक्तिची नवरात्रात पूजा केली जाते.

त्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे.तीनशे पासष्ट दिवसांत एक दिवस महिला दिवस साजरा करुन त्यांचा मानसन्मान केला जातो.बाकीच्या तीनशे चौसष्ट दिवसांचे काय? हा महत्वाचा प्रश्न आहे.स्त्रिया किती सुरक्षित आहेत.रोजच वर्तमानपत्र उघडतो तर त्यात महिलांचे शोषण,विनयभंग, बलात्कार, खून अश्या बातम्या असतातच.अगदी पाच-सात वर्षाचे मुलींन पासून तर साठ-पासष्ट वर्षांचे महिलांचा त्यात समावेश असतो.ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट

आहे.दोन दिवसापूर्वी नाशिक जिल्ह्यात इव्हेंट मँनेजमेंटचे नावाखाली दोन लाख रुपयांना महिलेची विक्री केल्याची घटना वाचायला मिळाली.

समाजात, शाळेत,नोकरीच्या ठिकाणी,नातेवाईकात,प्रवासात, एकटी स्त्री किती सुरक्षित आहे? मागील काळात अनेक ठिकाणी घडलेल्या बलात्काराच्या पाशवी घटनात एका स्त्री वर दहा पुरुष बलात्कार करतात. अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार

अशा अनेक ठीकाणी दररोज घडणाऱ्या स्त्रीअत्याचाराच्या घटना हे काय दर्शवितात? अनेक कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग सारख्या घटना घडतात त्यांच शोषण होत,त्या घटना दाबून टाकल्या जातात.

अनेक वेळा बायकांसारख्या बांगड्या भरल्या का? शब्दप्रयोग करून हिणवले जाते.हा सुध्दा स्त्रियांचा अपमानच आहे.बांगड्या भरा..बांगड्या भरा..असा शब्द प्रयोगा मागे स्त्रियांना कमी लेखण्याचा उद्देश आहे. एका दूरचित्रवाणी वरील चर्चेत एका माजी मंत्र्यांनी शब्दप्रयोग केला होता,त्यावेळी स्व.विद्या बाळ यांनी त्यांना खूपच कडक शब्दात फटकारले होते.पण असा सडेतोडपणा सगळ्याच महिलांजवळ नसतो,ज्याची आज गरज आहे.अजून एका माजी मंत्र्यांनी भरसभेत आपल्या तहसीलदार मँडम हिरोईन आहेत,असा सभेत उल्लेख केला, राजकीय क्षेत्रात तर महिला विषयी अर्वाच्य बोलणे वाढत आहे.स्त्रीचा अपमान तर होतोच पण शाब्दिक शोषणाचा प्रकार असे त्याला म्हणता येईल.त्यांनी ज्या भावनेने तो शब्दप्रयोग केला जातो तो तो चुकीचा असतो..

स्त्रियांना अनेक भुमिकेतून जावे लागते.माता..भगिनी..पत्नी ..मुलगी.त्या त्या वेळची जीवनातील भुमिका खऱ्या असतात.त्यात निष्ठा असते.तीच तर बांगड्या घालत असते..माता-भगिनी-पत्नी.तिची असे शब्दप्रयोगानी हेटाळणी करु नका.खऱ्या अर्थाने ती हिराँईन असते.

राजकीय क्षेत्रात ज्या महिला आहेत त्याच्यावरही खालच्या पातळीवर टिका होते. सोशल मिडियावर कोणी काय लिहावे यावर काही बंधनच नाही. राज्यात महिला आयोग आहे.त्यांनी अशा घटनांची नोंद घेउन संबधितांवर कारवाई करणे अपेक्षित असते. पण त्यांच्यावरच घाणेरड्या शब्दात लिहिले जाते. त्या काही करु शकत नाही. तर ईतरांची काय कथा. बलात्कार, स्त्रीअत्याचाराचे घटनामध्ये कारवाईस विलंब होतो.काही वर्षे निघून जातात.त्या घटनेच गांभीर्य रहात नाही. हे आपण बघतोय.आंध्रप्रदेश सरकारने कँबिनेट मध्ये दिशाकायदा मंजुरी दिली,सात दिवसांत तपास, चौदा दिवसांत न्यायालयीन कामकाज, आणि एकवीसाचे आत आरोपीस मृत्यूदंड. असा कायदा लागू होण्याची खूप चर्चा झाली.

महाराष्ट्रात आता स्त्रियांच्या संरक्षणासाठी शक्ती विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर होऊन त्यावर राज्यपालांची सही झाली . व ते पुढे राष्ट्रपतींच्या सहीसाठी वरती पाठवले गेले . ते दुरुस्तीसाठी परत आले. कायदा पास होईल पण असलेल्या कायद्याची अंमलबजावणी होणे हे महत्त्वाचे आहे. असंख्य कायदे अस्तित्वात आहेत, परंतु त्याची काय परिस्थिती आहे हे आपण बघतोच. कामाच्या ठिकाणी वावरताना महिलांना सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळणं हा त्यांचा हक्क आहे. हाच हक्क जपण्यासाठी महिला आयोगाचे अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी 'पॉश ऑडिट'चे निर्देश दिले आहेत. महिनाभरात राज्यातील सर्व सरकारी आणि खाजगी कार्यालयांचे परीक्षण पोस्ट ऑडिट होणार असून त्रुटी आढळल्यास कडक पावले उचलली जातील, असं सांगण्यात आलं आहे. महिला दिन जवळ आल्यानंतर अशा अनेक प्रकारच्या गोष्टी जाहीर होतात परंतु त्यातील किती पूर्ण जातात हा ही एक व चिंतन आणि विचार करण्यासाठी गोष्ट आहे. दुसरा मोठा प्रश्न आहे स्त्रियांचे बाबतीत तो दुय्यम स्थानाचा.आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा करुन घेतला जाणारा वापर. तसेच जाहिरात क्षेत्रात स्त्री देहाचा केला जाणारा वापर.

आता तो कसा केला जातो हे काय सांगायला हवे.??

आपला उत्पादनाचा खप वाढवण्यासाठी, दूरचित्रवाणीवरील मालिकांमध्ये, जाहिरातीमध्ये, अंडरवियर, बनियान, अत्तर स्प्रे, कुठल्याही चित्रपट, नाटकांचे जाहिरातीसाठी स्त्री देहाचा नको तितका वापर,स्त्री देहाच्या नको त्या भागाच प्रदर्शन केलं जात.अर्थातच यात स्त्रियांचा दोषही आहेच.नाही म्हणून चालणार नाही. त्या स्वतःच अधःपतन करुन घेत आहेत. चित्रपटात स्नानाचे आणि बेडसीन दिले जातात.. अतिशय भडक आणि सेक्सी दृश्य असतात.. अशे दृश्य व जाहिराती त्यांनी करायला नकोत. त्यात अमुलाग्र बदल आवश्यक आहे.स्त्री संघटनांनी,आयोगाने ह्याचेवर गंभीरपणे विचार करावा.

राजकीय क्षेत्रात,जसे विधान सभा,विधान परिषदेत स्त्रियांना नगण्य स्थान आहे.त्यातही मंत्रिपदासाठी वर्णी लागली तरी,कँबिनेट दर्जा फारच कमी महिलांना मिळतो.अशी परिस्थिती आहे.जिल्हा आणि तालुका पातळीवर ग्रामपंचायत, नगरपालिका, पंचायत समिती,जिल्हापरिषद, ह्या ठिकाणी स्त्री राखीव जागा असतात.त्यात काय परिस्थिती आहे हे आपण सगळेच जाणतो. सत्ताकेंन्द्र घरातच रहावे म्हणून तिकिटांचे वाटपासाठी व्यवस्था असते.त्यातील बहुतांश महिलांना ना समाजकार्याची आवड असते ना राजकारणाची.केवळ सत्ते साठी महिलांचा वापर करुन घेतला जातो काही महिलांना प्रासंगिक चार शब्द बोलता येत नाही.आपले हक्क जबाबदाऱ्या कर्तव्ये काय माहित नसते. काही महिलांना तर सही सुध्दा करता येत नाही.त्यांचे पतीच कामकाज बघतात ही परिस्थिती नाकारता येणार नाही. खरंच ज्या महिलांना समाजकार्य, राजकारणाची आवड असते त्यांना मात्र संधी मिळत नाही , महिला सक्षम पणे उभ्या रहात नाही त्याच्यात निर्णयक्षमता येत नाही तो पर्यंत स्त्रीमुक्त आहे हे खऱ्या अर्थाने म्हणता येणार नाही.

आता तर खूप ठिकाणी महिला नगरसेविका, नगराध्यक्ष, महापौर पदावर निवडून आलेल्या आहेत. खूप मोठी संधी चालून आली आहे.

आंतरराष्ट्रीय दिनाची थीम पहिल्यांदा १९९६ मध्ये सादर करण्यात आली. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी एक थीम निश्चित केली जाते. यंदाची थीम ही ऱ्र्ळींश ïं ऱ्र्ळप अशी आहे. याचा अर्थ असा की जेव्हा तुम्ही एखाद्याला काही देता तेव्हा तुम्हालाही त्याचा फायदा होतो. या थीमचा उद्देश लोकांना उदार हस्ते दान करण्यास प्रोत्साहित करणे आणि लिंग समानतेला प्रोत्साहन देणे आहे.

महिलांच्या हक्कांबद्दल आणि प्रतिष्ठेबद्दल जागरूकता पसरवणे, शिक्षण, नोकऱ्या आणि नेतृत्वात लिंग समानतेला प्रोत्साहन देणे,

घरगुती हिंसाचार, छळ, असमान वेतन आणि भेदभाव यासारख्या समस्यांवर प्रकाश टाकणे महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि विकासाला पाठिंबा देण्यासाठी सरकार, संस्था आणि कुटुंबांना प्रोत्साहित करणे.

स्त्री विषयक अनेक कायदे आहेत,महिलांना मिळणाऱ्या सवलतीआहेत,त्यांचीअधिकाधिक माहिती महिला पर्यंत पोहोचाव्यात, शक्ती कायदा लागू होऊन,अंमलबजावणी व्हावी,आणि महत्वाचे, मुळातच स्त्रियांकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन बदलावा. महिलांनीही आपल्या देहाचं जाहिरातीसाठी होणार प्रदर्शन थांबवावं.

ज्या महिलांमध्ये काही कतृत्व आहे त्यांना संधी प्राप्त करुन द्यावी. तरच महिला दिवस साजरा करण्याचे सार्थक होईल.

आजचा दिवस जितका महिलांसाठी खास,महत्त्वाचा आहे, तितकाच तो सगळ्यांसाठीही महत्त्वाचा आहे. कारण असे आहे, स्त्री एक मार्गदर्शक आहे. समर्थक आहे. प्रेरणादायी व्यक्ती आहे.प्रेरणेचे स्त्रोत आहे. ती आपल्या आयुष्यात कधी आई म्हणून, कधी बहीण म्हणून, कधी मैत्रीण म्हणून, तर कधी जीवनसाथी म्हणून असते. तिच्या प्रत्येक भूमिकेचा आपण आदरच करायला हवा. आपल्या आयुष्यात असणाऱ्या प्रत्येक स्त्रीचे आभार मानले पाहिजेत, कारण तिच्या विना जीवन अपूर्ण आहे.

ती आधी कुटुंब सांभाळत होती आता नोकरी करून कुटुंब सांभाळते.. पुरुष मात्र नोकरीच करत आलाय..कुटुंबासाठी अर्थार्जन करणे, कुटुंब सांभाळायला त्याला तेव्हाही स्त्रीच हवी होती आणि आजही स्त्रीच हवी आहे.. तो अवलंबून आहे त्या स्त्रीवर..

जागतिक महिला दिना निमित्ताने सर्व मातांना, भगिनींना,पत्नीला, मैत्रिणींना आणि आपल्या आयुष्यातील प्रत्येक स्त्रीला या विशेष दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पारनेरमध्ये ८ व ९ मार्च रोजी आरोग्याचा विराट महोत्सव

### खासदार निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित महाआरोग्ययज्ञ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर शहरातील पारनेर ग्रामीण रुग्णालयत ८ व ९ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्वात मोठ्या महाआरोग्ययज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. खासदार निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या संसदीय कारकिर्दीला ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.

या विराट महाआरोग्य शिबिरात राज्यातील नामांकित रुग्णालयातील एम डी,एम. एस. डी. एन. बी. तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहून रुग्णांची मोफत तपासणी, निदान व आवश्यक शस्त्रक्रिया करणार आहेत. हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब, सांधेदुखी,अपेंडिक्स, हार्निया,मुळव्याध,भगंदर गाठीची तपासणी, ईसीजी, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया १२ वर्षांपर्यंतच्या हृदयरोगग्रस्त बालकांची मोफत शस्त्रक्रिया, कान - नाक - घसा, त्वचारोग, स्तन व गर्भाशय कर्करोग तपासणी, दंतरोग, आयुर्वेद - नचरोपॅथी चरोपॅथी उपचार तसेच पॅरालिसस रुग्णांचे पुनरुपचार याचा समावेश आहे. शिबिरातील सर्व तपासण्या व उपचार पूर्णपणे मोफत असतील. सहभागी रुग्णांसाठी भोजन व विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे. निदान झालेल्या रुग्णांवर पुढील सहा महिने सातत्याने उपचार व फॉलोअप घेण्यात येणार असून त्याचा आढावा निलेश लंके प्रतिष्ठान मार्फत घेतला जाईल.

शिबिराचे उद्घाटन ८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी आमदार रोहित पवार, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार बजरंग सोनवणे, खासदार भास्कर भगरे, माजी आमदार प्राजक्त तनपुरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## टाकळी ढोकेश्वर येथील आदर्श ग्रामीण महिला मंडळ संस्थेला राज्य महिला आयोगाचा पुरस्कार जाहीर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्यात महिलाविषयक प्रश्नांवर केलेल्या सातत्यपूर्ण आणि प्रत्यक्ष प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या पारनेर तालुक्यातील तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल आदर्श ग्रामीण महिला मंडळ संस्थेचा महाराष्ट्र राज्य महिला आयोगातर्फे राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार देऊन सन्मान होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने कळविली आहे. ७ मार्चला मुंबई येथे जागतिक महिला दिनानिमित्त पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ही संस्था दिव्यांग मुलांच्या विकासासाठी, विशेषतः मतिमंद मुलांच्या निवासी शाळेच्या माध्यमातून शिक्षण आणि पुनर्वसनात व दिव्यांग कल्याण विभागाच्या अंतर्गत मुलांच्या विकासासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून जिल्ह्यात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आदर्श ग्रामीण महिला मंडळ हे टाकळी ढोकेश्वर मधील महत्वपूर्ण सामाजिक संस्थांपैकी एक असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य महिला आयोगाच्या वतीने यंदाच्या राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. आदर्श ग्रामीण महिला मंडळाच्या अध्यक्षा मंगल झावरे यांचा मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही ची बारीक नजर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, ठाणे :** विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम हाती घेण्यात आले असून मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली शीघ्रतेने ही योजना पुर्ण करण्यात येत आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०२४-२५ मधील उपलब्ध तरतुदीतून पहिल्या टप्प्यात एकूण ५४२ शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. या अंतर्गत कल्याण तालुक्यात १२० सीसीटीव्ही, भिवंडी ३०८ सीसीटीव्ही बसविण्याचे काम १०० टक्के पुर्ण झाले असून अंबरनाथ तालुक्यात ९६ सीसीटीव्ही बसवण्यात आले, तर १८ शाळेतील कामकाज प्रगतीपथावर आहे. असे एकूण ५२४ शाळांमध्ये शिक्षण विभाग (प्राथमिक) कार्यालयामार्फत सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०२५-२६ मधील जिल्हा नियोजन समितीच्या उपलब्ध निधीतून सीसीटीव्ही बसविण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. मुरबाड गटातील ३२९ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम नियोजित वेळेत सुरू असून या शाळांमधील सर्व यंत्रणा मार्च २०२६ अखेरपर्यंत कार्यान्वित होणार आहेत. शहापूर गटातील ४५७ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम नियोजित वेळेत सुरू असून या शाळांमधील सर्व यंत्रणा एप्रिल २०२६ अखेरपर्यंत कार्यान्वित होणार आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तसेच शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक सुरक्षित आणि पारदर्शक ठेवण्यासाठी ही यंत्रणा महत्त्वाची ठरणार आहे. शाळेच्या परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवणे, अनुचित प्रकारांना प्रतिबंध करणे आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे या दृष्टीने ही सीसीटीव्ही योजना राबविण्यात येत आहे.

## सोनाबाई साद यांचे वृद्धापकाळाने निधन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** नवीन बिना, मेन रोड भानेगाव (खापरखेडा) रहिवासी सोनाबाई रामायण साद यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या.

त्यांच्या पश्चयात श्रीराम व प्रकाश साद (पत्रकार) अशी दोन मुले, दोन मुली, सुना व नातवंडे व मोठा आप्तपरिवार आहे.

अंत्ययात्रा त्यांच्या राहत्या घरून शुक्रवार, दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजता निघून कामठी रोड कोलार घाट वैकुंठ धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बनावट खत - कीटकनाशक बनविणाऱ्यांवर कारवाई करा - आमदार दाते

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडला प्रश्न




> या कारवाईत विविध नामांकित कंपन्यांच्या नावाने बनावट पिशव्यांमध्ये खते भरून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे. संबंधित साठा जप्त करण्यात आला असून या प्रकरणी संबंधित संस्था, पुरवठादार आणि मालकांविरोधात कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. खते नियंत्रण आदेश १९८५ तसेच आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.
>
> **- दत्ता भरणे (कृषीमंत्री)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** शेतकर्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उत्पादनाच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने आग्रही भूमिका मांडत असलेल्या आमदार काशिनाथ दाते यांनी पुन्हा एकदा शेतकर्यांच्या हिताचा प्रश्न थेट विधानसभेत मांडत सातारा जिल्ह्यातील बनावट रासायनिक खते व कीटकनाशके तयार करणार्या कारखान्यांच्या प्रकरणावर सरकारचे लक्ष वेधले. सध्या सुरू असलेल्या २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी हा प्रश्न उपस्थित करत शासनाकडून सविस्तर माहिती मागवली. शेतकर्यांची फसवणूक करणार्या अशा प्रकारांवर कठोर कारवाई व्हावी, अशी आग्रही मागणीही त्यांनी यावेळी केली.

आमदार दाते यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना संबंधित विभागाचे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, सातारा जिल्ह्यातील वडूज (ता. खटाव) परिसरात कृषी विभाग व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या संयुक्त कारवाईत बनावट रासायनिक खते व कीटकनाशके जप्त करण्यात आली आहेत. तपासादरम्यान मोठ्या प्रमाणावर बनावट

खतांची साठवण आढळून आली असून त्याची किंमत लाखो रुपयांमध्ये असल्याचे स्पष्ट झाले आहे. याशिवाय जिल्हास्तरीय भरारी पथक आणि कृषी विभागाने संयुक्त तपास सुरू ठेवला असून शेतकर्यांची फसवणूक करणार्या अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलली जात असल्याचे शासनाने स्पष्ट केले.

दरम्यान, शेतकर्यांना निकृष्ट व बनावट खतांपासून संरक्षण मिळावे, यासाठी अशा प्रकरणांवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले. शेतकर्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उत्पादनाच्या सुरक्षिततेसाठी शासनाने अधिक सतर्कता बाळगावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी विधानसभेत केली.

# मुलांचे स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येक आई वडीलांचे संस्कार महत्त्वाचे - विश्वास नांगरे पाटील

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०५, पाटण (सातारा) :** आपल्या मुलांच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येक आई वडीलांचे संस्कार महत्त्वाचे असतात ते संस्कार संभाजीराव पाटणकर यांनी आपल्या मुलीला दिले. यांवर त्यांनी अतिशय चांगले माझी स्वप्नपूर्ती या पुस्तकाची निर्मिती समाजाला मार्गदर्शन ठरेल असे दिले. पुस्तक निर्मीतीचा अनुभव जो आहे. त्यातील भाषा त्याचे स्वरूप, पुस्तक निर्मीतीचा आनंद जसा लहान बाळाला जन्म दिल्यानंतर होतो तस हे सगळ साहित्य घडताना लेखकाला आनंद मिळतो. पोलिस अधिकाऱ्याची आत्मकथा आहे. त्यामुळे त्यात वेदना असतील अनुभव असतील रोजचे चढ उताराचे प्रसंग असतील. निश्चितपणे त्यातून त्यांचा एक प्रवास पोलिस कॉन्स्टेबल पासून ते रिटायर्ड एपीआय पर्यंतचा प्रवास अनेकांना विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना दिशादर्शक मार्गदर्शक ठरेल. यात काही शंका नाही. असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्याचे अप्पर पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांनी संभाजीराव पाटणकर यांनी लिहिलेल्या माझी स्वप्नपूर्ती या पुस्तक प्रकाशनावेळी सांगितले. मुंबई येथे झालेल्या या प्रकाशन सोहळ्यासाठी निवृत्त पोलिस आयुक्त इसाक बागवान, अमोल शिंदे, माझी स्वप्नपूर्ती या पुस्तकाचे लेखक सेवानिवृत्त एपीआय संभाजीराव पाटणकर त्यांच्या मातोश्री शीमती लक्ष्मीबाई पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विश्वास नांगरे पाटील आपल्या भाषणात पुढे म्हणाले




संभाजीराव पाटणकर यांचा प्रवास पाटण मधल्या एका छोट्या गावातून झाला. ते मुंबई मध्ये आले. योगायोग होता ते पोलिस भरतीला अचानक उभे राहिले. ते पोलिस अंमलदार झाले. त्यानंतर त्यांनी खात्यांतर्गत परीक्षा दिली. मी डीसीपी होतो तेंव्हा ते एसीपी बागवान यांचे शुर आणि धाडशी पोलिस इन्स्पेक्टर नंतर एपीआय झाले. खुप चांगलं टिमवर्क असायचं आमच्यामध्ये.

आपण काही स्वप्न घेऊन मुंबईमध्ये आलो. स्वप्न ही जगुन देत नाहीत. मी ही जेंव्हा मुंबईला आलो तेंव्हा पत्र्याची पेटी घेऊन आलो. कधी गावच्या मित्रांच्या रुममध्ये तर कधी आमदार निवासला राहण्याची सोय व्हायची. मित्रांच्या खोलीत राहताना एका खोलीत तीस तीस जण राहायचो ही परिस्थिती अनुभवताना आपण जर अभ्यास केला नाही तर या खोलीत ऐकतीसावा नंबर आपला आहे अस वाटायचं. मग पहाटे तीन वाजता उठून अभ्यास करायचा मनात एक जिद्द ठेवून होतो. शनिवार रविवार आला की घरचं जेवू वाटायचं मग मुंबईतच पाहुण्यांच्या घरी जायचं तिथं त्यांची टोमणे ऐकायला मिळायचे. अरे कोणला अभ्यास करून आहेस, आयपीएस, पोलिस अधिकारी होता येतं का..? काही कामाधंद्याच बघा त्यावेळेला मग डोळ्यात अश्रू यायचे तेवढ्या जिद्दीने पुन्हा अभ्यासाला लागायचं फक्त स्वप्नपूर्ती साठी. तेंव्हा हा प्रवास आहे. पाटण पासून मुंबईपर्यंत आणि मुंबई पासून कॅनडा पर्यंतचा तो पुढच्या पिढीसाठी ज्या ठिकाणी स्त्रीला सन्मान मिळतो तीचा आदर होतो त्या ठिकाणी देवांचे वास्तव्य असते आणि ज्या ठिकाणी तिचा अपमान होतो त्याठिकाणी कोणतही यश प्राप्त होत नाही तेथील समाज रसातळाला जातो. त्यामुळे त्यांचा सन्मान आदर करायला शिकले पाहिजे.

आपल्या मुलांचे स्वप्नपूर्तीसाठी ते संस्कार संभाजीराव पाटणकर यांनी आपल्या मुलीला दिले. यांवर त्यांनी अतिशय चांगले माझी स्वप्नपूर्ती या पुस्तकाची निर्मिती केली. हे समाजाला मार्गदर्शन करेल. पुस्तक निर्मीतीचा आनंद जसा लहान बाळाला जन्म दिल्यानंतर असतो तसा आनंद साहित्य घडताना लेखकाला होतो. या पुस्तकात पोलिस अधिकाऱ्याची आत्मकथा आहे. त्यामुळे त्यात वेदना असतील अनुभव असतील रोजचे चढ उताराचे प्रसंग असतील. निश्चितपणे त्यातून त्यांचा एक प्रवास पोलिस कॉन्स्टेबल ते रिटायर्ड एपीआय पर्यंतचा प्रवास अनेकांना विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना दिशादर्शक ठरेल. यात काही शंका नाही. अत्यंत देखण्या पुस्तकाची निर्मिती केल्याबद्दल मी संभाजीराव पाटणकर यांच्यासह सर्वांना धन्यवाद देतो. असे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी लेखक संभाजीराव पाटणकर म्हणाले माझी स्वप्नपूर्ती हे केवळ आत्मचरित्र नसून एका वडीलांच्या धाडसाची जिद्दीची आणि मुलीच्या शिक्षणावरील अढळ विश्वासाची प्रेरणादायी कहाणी आहे. गरीब शेतकरी कुटुंबातून आलेल्या लेखकाने आयुष्यभर संघर्ष करत पोलिस सेवेत आपली ओळख निर्माण केली. मात्र त्यांच्या जिवणातील सर्वात मोठा धाडशी निर्णय म्हणजे मुलीच्या उच्च शिक्षणासाठी तीला परदेशी पाठविणे. मुलीच्या शिक्षणावर एवढा खर्च करण्यापेक्षा तिचे लग्न लावून मोकळे व्हा असा अनेकांनी सल्ला दिला मात्र समाजाच्या पारंपरिक चौकटीला छेद देत परदेशी शिक्षणासाठी कर्ज काढून तीला परदेशी पाठविले. आज तीच मुलगी कॅनडामधे स्वतः च्या पायावर उभी राहून आई वडीलांचे नाव उज्वल करत आहे. हा संघर्ष त्याग आणि विश्वासाचा प्रवास या पुस्तकाचा अलय आहे. असे त्यांनी सांगितले. यावेळी आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. या प्रकाशन सोहळ्यास संभाजीराव पाटणकर यांचे कुटुंबीय व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ करिता नवी मुंबई मनपाचे नियोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, नवी मुंबई :** स्वच्छतेमध्ये देशात अग्रेसर शहर ही नवी मुंबईची ओळख बनलेली असून मागील काही वर्षे सातत्याने पहिल्या तीन क्रमांकात येणाऱ्या देशातील निवडक शहरांना नियमित क्रमवारीच्या उच्च स्थानी नेऊन 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत देशातील स्वच्छ शहरांची 'सुपर स्वच्छ लीग' ही विशेष कॅटेगरी निर्माण करण्यात आली आहे. यामध्ये नवी मुंबई शहराचा समावेश असणे ही आनंददायी व अभिमानास्पद गोष्ट आहे. मात्र या 'सुपर स्वच्छ लीग' मध्ये आपले मानांकित स्थान टिकवून ठेवणे ही मोठी जबाबदारी आहे हे लक्षात घेत लवकरच सुरु होणाऱ्या 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५- २६' मध्ये नवी मुंबई महानगरपालिका संपूर्ण क्षमतेने सहभागी होत आहे.

या अनुषंगाने करावयाची कार्यवाही व उचलावयाची पावले याचा सविस्तर आढावा नुकताच महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष बैठकीत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी घेतला. यावेळी शहर अभियंता शिरीष आरदवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' करिता केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत मिशन'ने जाहीर केलेल्या टूल किट मधील बाबींवर यावेळी सविस्तर विचार करण्यात आला. या सर्वेक्षणामध्ये एकूण १२५०० गुणांचे नियोजन असून त्यामध्ये प्रत्यक्ष स्वच्छता पाहणीवर भर दिला जाणार आहे. प्रत्यक्ष पाहणीद्वारे परीक्षण व नागरिक प्रतिसाद (उळींळूशप ऋशशवलरलज्ञ) याकरिता १०५०० गुण असणार आहेत. त्यामध्ये प्रत्यक्ष स्वच्छता याकरिता १५०० गुण व नागरिक प्रतिसाद/ तक्रार निवारण याकरिता १००० गुण ठेवण्यात आले आहेत.

स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत सिटी प्रोफाईलमध्ये नमूद क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रीत केले जाणार असून त्यामध्ये मार्केट, वर्दळीची ठिकाणे, व्यावसायिक व व्यापार क्षेत्रे, झोपडपट्टी व गावठाण भाग, बॅक लेन, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, जलाशय, नैसर्गिक नाले, गटारे, मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती करणा-या सोसायट्या / संस्था, थ्री आर सेंटर्स, उद्यान स्वच्छता व तेथील सुविधा, कचऱ्यापासून नवनिर्मितीवर भर, वायू प्रदूषण नियंत्रणावर विशेष लक्ष, बांधकाम व पाडकाम कचऱ्याची योग्य विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणी कचरा पेट्या, चित्रांकित भिंती व शिल्पाकृतीतून सुशोभिकरणावर भर अशा विविध बाबींचा समावेश आहे.

या वर्षीच्या सर्वेक्षणात 'शैक्षणिक संस्थामधील स्वच्छतेच्या सवयींमध्ये बदल' या विषयास अनुरूप विविध प्रकारच्या उपक्रम आयोजनावर विशेष भर दिला जाणार आहे. त्याचप्रमाणे, संस्थात्मक मापदंड निश्चित करुन पर्यावरण संस्था सक्षम करण्यावरही भर दिला जाणार आहे. यावेळी स्वच्छता ॲप आणि सिटीझन फीडबॅकवर विशेष लक्ष देऊन गुणवाढीवर भर देण्यासाठी अधिक व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

त्याचप्रमाणे 'स्वच्छ शहर जोडी' या संकल्पनेनुसार नवी मुंबई महानगरपालिकेस जोडलेल्या लोणार व मलकापूर नगरपरिषद आणि केज, कन्नड, जिंतूर या नगरपंचायतीचे स्वच्छता मानांकन उंचविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका मार्गदर्शकाची भूमिका बजावणार आहे. यादृष्टीने सदर शहरांना नवी मुंबई महानगपालिकेच्या अधिकारी शिष्टमंडळाने प्रत्यक्ष भेट देऊन स्वच्छतेच्या अनुषंगाने पहाणी केली आहे व आवश्यक सुधारणा सुचविल्या आहेत. या शहरांसाठी २ दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्याविषयी या बैठकीत विचार करण्यात आला.

'सुपर स्वच्छ लीग' मधील आपले स्थान अधिक सक्षम करण्यासाठी 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' मध्ये नवी मुंबई सज्ज झाली असून स्वच्छताप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांनी स्वच्छता उपक्रमात मोठ्या संख्येने सक्रीय सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

